पुणेजिल्हा शिक्षण मंडळाचे

# मामासाहेब मोहोळ कॉलेज

पौड रोड पुणे ३८

# विद्यार्थी विकास मंडळ अहवाल २०२३-२४

विद्यार्थी विकास मंडळ (BSD) विद्यापीठाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या अधिकारांचे संरक्षण आणि पर्यवेक्षण करते. कॉर्पोरेट जीवनासाठी विद्यार्थ्यांच्या विविध उपक्रमांना प्रोत्साहन आणि समन्वयित करते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासामध्ये सुधारणा करण्यासाठी आणि जागतिकीकृत जगात स्पर्धा करण्यासाठी त्यांना सुसंस्कृत भारतीय नागरिक बनवण्यासाठी विविध क्रियाकलापांसह त्यांची मानसिक, शारीरिक, सांस्कृतिक वाढ करण्याचा प्रयत्न करते.

या शैक्षणिक वर्षामध्ये गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी कर्मवीर भाऊराव पाटील कामाव शिका योजना राबविण्यात आली . या अंतर्गत एकूण २३ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागात एकूण **3062.10 तास** व रुपये 1,49,759.5 इतके काम केले .

Viksit Bharat@2047: 11 डिसेंबर 2023 रोजी सकाळी 10.30 वाजता माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या उपस्थितीत Voice of Youth उपक्रम आयोजित करण्यात आला आणि pmindiawebcast.nic.in या वेब लिंकद्वारे वेबकास्ट करण्यात आला. विद्यार्थी विकास मंडळाने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी कॉम्प्युटर लॅबमध्ये वेबकास्ट कार्यक्रम आयोजित केला होता. या उपक्रमासाठी प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.नंतर विद्यार्थ्यांना MyGov वेबसाइटवर फीडबॅक भरण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. विद्यार्थ्यांची संख्या: १२८ शिक्षकांची संख्या: ०५

विद्यार्थी विकास मंडळ युनिटने “मेरी माती मेरा देश” या राष्ट्रीय मोहिमेत भाग घेतला. सीओईपी पुणे येथे झालेल्या कार्यक्रमात महाविद्यालयाने सहभाग घेतला, ज्यामध्ये राज्यातील विविध ठिकाणांहून आलेली माती गोळा करून दिल्लीला पाठवण्यात आली. महाविद्यालयाने "सेल्फी विथ माटी उपक्रम" मध्ये मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला आणि SPPU ने केलेल्या जागतिक विक्रमाला पाठिंबा देण्यासाठी जवळपास 3223 सेल्फी गोळा केले. "कृतज्ञता कार्यक्रम" मध्ये महाविद्यालय आणि बीएसडी अधिकारी यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

विद्यार्थी विकास मंडळाने  या शैक्षणिक वर्षात एकूण सहा चर्चासत्रे आयोजित केली. त्याचे तपशील खालील प्रमाणे:

१) Intellectual Property Right  हि कार्यशाळा दिनांक ३१/१२/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती या कार्यशाळेसाठी रु ३००० प्राप्त झाले. या कार्यशाळेत ८८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

२) Environment Awareness हि कार्यशाळा दिनांक 0१/01/२०२4 रोजी आयोजित करण्यात आली होती या कार्यशाळेसाठी रु ३००० अनुदान प्राप्त झाले. या कार्यशाळेत 208 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

3) Stress management हि कार्यशाळा दिनांक 17/01/2024 रोजी आयोजित करण्यात आली होती या कार्यशाळेसाठी रु ३००० अनुदान प्राप्त झाले. या कार्यशाळेत 87 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

4) Personality Development हि कार्यशाळा दिनांक 25/01/2024 रोजी आयोजित करण्यात आली होती या कार्यशाळेसाठी रु ३००० अनुदान प्राप्त झाले. या कार्यशाळेत 51 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

5) Nirbhay Kanya Abhiyan हि कार्यशाळा दिनांक 17/01/2014 रोजी आयोजित करण्यात आली होती, या कार्यशाळेसाठी रु 5000 अनुदान प्राप्त झाले. या कार्यशाळेत 134 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

6) Solar lamp making and Business training हि कार्यशाळा दिनांक 14/02/2024 रोजी आयोजित करण्यात आली होती या कार्यशाळेसाठी रु 8000 अनुदान प्राप्त झाले. या कार्यशाळेत 63 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

डॉ.सपना सुनीत राणे

विद्यार्थी विकास अधिकारी